४०३।५
३८५

# महाराष्ट्र शासन
## संचालनालय, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य.
## कोकण भवन, सहावा मजला, नवी मुंबई ४०० ६१४

☎🖷 -०२२-२७५७१३९१ E.Mail:- calfak६@yahoo. com

**कार्यालयीन आदेश क्र. ०७ दिनांक ३१/०१/२०११**

विषय :- कार्यालयीन आदेश क्र.९० दि.२८/७/२००६ अन्वये निकाली काढलेल्या घटकांबाबत.

वाचा :- १) या संचालनालयाचा कार्यालयीन आदेश क्र.९० दि.२८/७/२००८.
२) या संचालनालयाचा कार्यालयीन आदेश क्र.४ दि. ४/१/२०१०.

मुख्य लेखापरीक्षक यांचे कार्यालयीन आदेश क्र.९० अन्वये निकाली काढलेल्या घटकांचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या कालावधीचे लेखापरीक्षण होण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्यावर विभागीय सहमुख्य लेखापरीक्षक यांनी त्यांचे स्तरावरुन कार्यवाही करण्याबाबत कार्यालयीन आदेश क्र.४ दि.४/१/२०१० मध्ये निर्देशित करण्यात आले होते. मात्र लेखापरीक्षण प्रस्ताव मंजुर करण्याच्या कार्यपध्दती मध्ये बराचसा कालावधी लागत असल्याचे या संचालनालयाच्या निदर्शनास आल्याने कार्यालयीन आदेश क्र.४ दि.४/१/२०१० मध्ये अंशत: बदल करण्यात येत आहे. यानुसार कार्यालयीन आदेश क्र.९० अन्वये निकाली काढलेल्या घटकांचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्या कालावधीचे लेखापरीक्षण होण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्यावर विभागीय सहमुख्य लेखापरीक्षकांऐवजी त्याच जिल्ह्याच्या उपमुख्य लेखापरीक्षक यांनी त्यांचे स्तरावरुन कार्यवाही करावी.

(के.एम.विधाते)
मुख्य लेखापरीक्षक
स्थानिक निधी लेखा, संचालनालय
महाराष्ट्र राज्य.

प्रत :१) सहमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, सर्व
२) उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, सर्व यांनी आपल्या कार्यालयात कार्यालयीन आदेश क्र.९०अन्वये निकाली काढलेल्या घटकांबाबत सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील नोंदवही ठेवावी व त्यातील नोंदी अद्यावत ठेवाव्यात.
३) अभिलेखापाल.

Pravin com/acer/ahawaal/aa२/letter/२२/१२/१०.